पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय,भोसरी २६
जा.क्र.कप्र/सभा/९/कावि/४६५/२००९
दिनांक:- १५ /१२ /२००९

प्रति,

........................
सदस्य/सदस्या
क प्रभाग समिती

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासीक सभा क्र.१० बुधवार दिनांक ६ /१/२०१० रोजी दु.१२.०० वाजता आयोजीत केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ६/१/२०१० रोजी दु.१२.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजीत केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका क्र.१० जोडली असून सभेस आपण उपस्थित रहावे,ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत. १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय,भोसरी २६
कार्यक्रमपत्रिका क्र.१०

दिनांकः- ६ /१/२०१० वेळ. दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासीक सभा दिनांक ६/१/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता क प्रभाग कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजीत करण्यात आली आहे.सदर सभेमध्ये विषय चर्चेसाठी व मंजुरीसाठी ठेवणेत आलेले आहेत.

विषय क्र.१ पिंपरी चिंचवड क प्रभाग आरोग्य विभागाचे सन २००९ -२०१०या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पात खाजगीकरणद्वारे साफसफाई या लेखाशिर्षावर र.रु. १,४०,००,०००/- तरतूद करणेत आलेली आहे. सदर तरतूदीमधून आजअखेर र.रुपये १,०९,२४,१००/- इतका खर्च झाला असून र.रुपये ३०,७५,९००/- तरतूद शिल्लक आहे.

उपलब्ध असलेली तरतूद कामकाज पाहता भविष्यात अपूरी पडणार असून दैनंदिन कामकाजात व्यत्यय निर्माण होवू शकतो.

सबब,खाजगीकरणद्वारे साफसफाई या लेखाशिर्षावर र.रु.१०,००,०००/- इतकी तरतूद वर्ग होणे आवश्यक आहे.सदरची रक्कम कुंडीविरहीत वॉर्ड योजना या लेखाशिर्षातून वर्ग करता येणे शक्य आहे. तरी सदरची तरतूद वर्ग करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२ भोसरी लांडेवाडी स.नं.१०/८ येथे असलेल्या मशिदीच्या प्रेवशद्वारसमोरील मुतारीमुळे दुर्गंधी पसरते म्हणून सदरची मुतारी काढणेची मागणी वरील संदर्भ क्र.१ तझीम आलू-मुसलेमीन यांचे दि.१०/९/०९ चे पत्र व संदर्भ क्र.२ मा.शिवाजी आढळराव पाटील खासदार,शिरुर यांचे दि.१६/११/०९ चे पत्राद्वारे मा.आयुक्त यांचेकडे करण्यात आलेली आहे.सदरची मुतारी फार पूर्वीची व त्या परीसरात एकमेव आहे,तिचा वापर असंख्य नागरीक करतात सदरची मुतारी पाडल्यास अनेक नागरीकांची गैरसोय होणार आहे. त्यामुळे सदर मुतारी पाडावी किंवा कसे याबाबतचा निणर्य मा.क प्रभाग समितीमध्ये मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ मौजे दिघी येथील नविन हद्दीवाढीच्या भागशः विकास योजनेतील स.नं.२ व ३ मधील संरक्षण खात्याच्या हद्दीलगत असलेल्या १५.० मी रस्ता स्थलांतरीत करणेबाबत.
( महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये )

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेत मौजे दिघी येथील स.नं.२ व ३ मध्ये संरक्षण हद्दीस लागून विकास योजनेत १५.० मी.रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तथापि सदर रस्त्याचे आखणीमध्ये माजी सैनिकांची घरे बाधीत होत आहेत. परंतु सदर घरांच्या समोर अस्तित्वातील रस्ता असून विकास योजनेतील १५.० मीटर रस्ता हा सदर अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित केल्यास संरक्षण हद्दीस लागून असलेल्या नागरिकांची घरे वाचतील.

सबब स.नं.२ व ३ मधील संरक्षण हद्दीस लागून असलेला १५.० मी. रस्ता स्थलांतरीत करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास योजनेत फेरबदल करणेकामी विषयपत्र मा.क प्रभाग समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी ठेवणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे विषयपत्र मा.क प्रभाग समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी ठेवण्यात यावे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढीच्या भागशः मंजूर विकास योजनेत मौजे दिघी येथील स.नं.२ व ३ मध्ये संरक्षण हद्दीस लागून विकास योजनेत १५.० मी.रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तथापि सदर रस्त्याचे आखणीमध्ये माजी सैनिकांची घरे बाधीत होत आहेत. परंतु सदर घराच्या समोर अस्तित्वातील रस्ता असून विकास योजनेतील १५,० मी रस्ता हा सदर अस्तित्वातील रस्त्यास प्रस्तावित केल्यास संरक्षण हद्दीस असलेल्या नागरिकांची घरे वाचतील. तसेच सदर रस्त्याचे आखणीत होणा-या फेरबदलामुळे रस्त्यालगत असणारी आरक्षणाचे हद्दीत देखील फेरबदल करणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये भागशः मंजूर विकास योजनेत फेरबदल करणेकामी मान्यता देणे तसेच सदर फेरबदलाचे अनुषंगाने प्राप्त हरकतीसह प्रस्तुतूचा फेरबदलचा प्रस्ता शासनास सादर करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३ फुगेवाडी जकात नका येथे १५ मिटर वायरलेस अँटिना मास्ट उभारणेकामी र.रुपये ६,००,०००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४ भोसरी तळे येथील उद्यानातील डेकोरेटिव्ह दिवे,सोडि.व्हेपर दिवे,विद्युत पंप,एरिएटर व विद्युत विषयक कामांची वार्षिक पध्दतीने चालन देखभाल दुरुस्ती करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५ मनपाच्या उद्यानातील होणा-या उद्घाटन भूमीपूजन व इतर कार्यक्रमाकरिता तात्पुरत्या स्वरुपात दोन वर्षाकरीता ध्वनिक्षेपण व विदयुत व्यवस्था करणे.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय,भोसरी २६
जा.क्र.कप्रस/सभा/९/कावि/४६५/२००९
दिनांकः- १५ /१२ /२००९